एस.सी.सी. २८४/२०२१
निशाणी क्र. ३३

# आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ नुसारचे निवेदन

माझे नाव – कमल विजय खरात,
वय – ३० वर्षे,
रा. कोतुळ, ता. अकोले, जि. अहमदनगर.

| | |
|---|---|
| | फिर्यादी पक्षाचा पुरावा तुम्हाला समजला, तो मी तुम्हाला वाचुन दाखवत आहे. |
| प्रश्न १ | तुम्हाला विचारल्या जाणा–या प्रश्नांची उत्तरे देणे तुम्हास बंधनकारक नाही याची तुम्हाला माहिती आहे काय ? |
| उत्तर | होय. |
| प्रश्न २ | प्रस्तुत संपरिक्षेच्या पुराव्यात आपल्या विरुध्द दिसणा–या परिस्थिती विशेषांच्या व्यक्तिशः खुलासा करण्यासाठी आता तुम्हाला प्रश्न विचारले जातील. सदर प्रश्नांची उत्तरे दिल्यामुळे किंवा त्यांना खोटी उत्तरे दिल्यास तुम्ही स्वतः शिक्षेस पात्र होणार नाही. परंतु तुम्ही दिलेली उत्तरे प्रस्तुत संपरिक्षेत विचारात घेता येईल किंवा अन्य कोणत्याही चौकशीत किंवा संपरीक्षेत तुमच्या बाजुने किंवा विरुध्द मानता येईल, हे तुम्हास समजले काय ? |
| उत्तर | होय. |
| प्रश्न ३ | अभियोग पक्षाचा सा.क्र. २ फिर्यादी पो. कॉ. विजय आण्णा खुळे यांच्या पुराव्यात त्यांनी असे कथन केले आहे की, दिनांक २६.०७.२०२० रोजी ते पोलीस स्टेशन अकोले येथे पोलीस कॉन्स्टेबल म्हणून कार्यरत होते व त्या दिवशी ते, पोलीस हे. कॉ. टोपले, पो.कॉ. बडे व महिला पो. कॉ. घुले असे कार्यरत होते, याबाबत तुमचे काय म्हणणे आहे ? |
| उत्तर | खोटे आहे. |
| प्रश्न ४ | पुढे त्यांच्या पुराव्यात त्यांनी असे कथन केले आहे की, त्यावेळी पोलीस निरिक्षक जोंधळे साहेबांनी त्यांना कॅबीनमध्ये बोलावले व सांगितले की, कोतुळ येथे आण्णाभाऊ साठेनगर येथे एक महिला चोरून देशी दारूची विक्री करत आहे, आत्ता गेले तर |

| | |
|---|---|
| | मिळून येईल, याबाबत तुमचे काय म्हणणे आहे ? |
| उत्तर | खोटे आहे. |
| प्रश्न ५ | पुढे त्यांच्या पुराव्यात त्यांनी असे कथन केले आहे की, त्यानंतर ते, पो.हे.कॉ. टोपले, पो.कॉ. बडे व महिला पो.कॉ. घुले असे खाजगी वाहनाने कोतुळ दुरक्षेत्र येथे गेले, याबाबत तुमचे काय म्हणणे आहे ? |
| उत्तर | खोटे आहे. |
| प्रश्न ६ | पुढे त्यांच्या पुराव्यात त्यांनी असे कथन केले आहे की, तेथे गेल्यानंतर पो.हे.कॉ. टोपले यांनी दोन पंचांना बोलावले व बातमीतील हकिगत त्यांना समजावून सांगितली, याबाबत तुमचे काय म्हणणे आहे ? |
| उत्तर | खोटे आहे. |
| प्रश्न ७ | पुढे त्यांच्या पुराव्यात त्यांनी असे कथन केले आहे की, त्यानंतर ते, पोलीस स्टाफ व पंच असे पायी कोतुळ दुरक्षेत्र येथून नमूद ठिकाणी गेले, याबाबत तुमचे काय म्हणणे आहे ? |
| उत्तर | खोटे आहे. |
| प्रश्न ८ | पुढे त्यांच्या पुराव्यात त्यांनी असे कथन केले आहे की, तेथे तुम्ही चोरून देशी दारूची विक्री करताना दिसून आलात व त्यानंतर महिला पो.कॉ. घुले यांनी तुम्हाला ताब्यात घेतले, याबाबत तुमचे काय म्हणणे आहे ? |
| उत्तर | खोटे आहे. |
| प्रश्न ९ | पुढे त्यांच्या पुराव्यात त्यांनी असे कथन केले आहे की, तेव्हा तुम्हाला तुमचे नाव विचारले असता तुम्ही तुमचे नाव कमल विजय खरात असे सांगितले, याबाबत तुमचे काय म्हणणे आहे ? |
| उत्तर | खोटे आहे. |
| प्रश्न १० | पुढे त्यांच्या पुराव्यात त्यांनी असे कथन केले आहे की, त्यांनी १७:०० वाजता छापा टाकला होता, तेव्हा तुमच्या ताब्यात ३२ बॉबी संत्रा देशी दारूच्या बाटल्या मिळून आल्या, याबाबत तुमचे काय म्हणणे आहे ? |

| | |
|---|---|
| उत्तर | खोटे आहे. |
| प्रश्न ११ | पुढे त्यांच्या पुराव्यात त्यांनी असे कथन केले आहे की, पोलीस कॉन्स्टेबल टोपले यांनी पंचांसमक्ष त्याचा घटनास्थळ जप्ती पंचनामा केला, याबाबत तुमचे काय म्हणणे आहे ? |
| उत्तर | खोटे आहे. |
| प्रश्न १२ | पुढे त्यांच्या पुराव्यात त्यांनी असे कथन केले आहे की, त्यापैकी एक बाटली रासायनिक विश्लेषणाकरीता वेगळी काढून पंचांच्या सहीचे लेबल लावले व त्यानंतर तुम्हाला व मुद्देमाल घेवून पोलीस स्टेशनला गेले व सदर घटनेबाबत त्यांनी फिर्याद दिली, याबाबत तुमचे काय म्हणणे आहे ? |
| उत्तर | खोटे आहे. |
| प्रश्न १३ | अभियोग पक्षाचा सा.क्र. ३ तपासी अंमलदार पो.ह. बारकु बाळू गोंदे यांच्या पुराव्यात त्यांनी असे कथन केले आहे की, सन २०२० मध्ये ते पोलीस स्टेशन अकोले येथे पोलीस नाईक म्हणून कार्यरत होते व त्यांच्याकडे गुन्हा रजिस्टर क्रमांक ५४९/२०२० कलम ६५ई चा तपास सोपवण्यात आला होता, याबाबत तुमचे काय म्हणणे आहे ? |
| उत्तर | खोटे आहे. |
| प्रश्न १४ | पुढे त्यांच्या पुराव्यात त्यांनी असे कथन केले आहे की, सदरचा तपास हा हवालदार पालवे यांच्याकडे होता व ते मयत झाल्यानंतर तोंडी आदेशाने सदर गुन्ह्याचा तपास त्यांच्याकडे देण्यात आला होता, याबाबत तुमचे काय म्हणणे आहे ? |
| उत्तर | खोटे आहे. |
| प्रश्न १५ | पुढे त्यांच्या पुराव्यात त्यांनी असे कथन केले आहे की, पकडलेली दारू ही रासायनिक विश्लेषणाकरीता पाठवली होती व त्याचा रासायनिक विश्लेषणाचा अहवाल हस्तगत करून तो कागदपत्रात समाविष्ट केला आणि आरोपी विरूध्द दोषारोपपत्र दाखल केले, याबाबत तुमचे काय म्हणणे आहे ? |
| उत्तर | खोटे आहे. |

| | |
|---|---|
| प्रश्न १६ | निशाणी ३१ वर दाखल असलेल्या रासायनिक विश्लेषणाच्या अहवालाबाबत तुमचे काय म्हणणे आहे ? |
| उत्तर | खोटा रिपोर्ट आहे. |
| प्रश्न १७ | साक्षीदार तुमच्या विरुध्द का सांगत आहे ? |
| उत्तर | त्यांचा केसेसचा कोटा पुर्ण करण्यासाठी. |
| प्रश्न १८ | तुम्हाला इतर काही पुरावा देणे आहे काय ? |
| उत्तर | नाही. |
| प्रश्न १९ | तुम्ही बचावार्थ स्वत:चा पुरावा नोंदवणार काय ? |
| उत्तर | नाही. |
| प्रश्न २० | तुम्हाला केसबाबत काही सांगायचे काय ? |
| उत्तर | कोटा पुर्ण करण्याकरीता खोटी केस केली आहे. |

आरोपीची सही

.....................................
कमल

20.12.25

**( अनंत रा. टेंगसे )**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
कोर्ट नं. २, अकोले

दिनांक – २०.१२.२०२५
ठिकाण – अकोले

**प्रमाणपत्र**

प्रमाणित करण्यात येते की, आरोपीचे निवेदन माझे समक्ष नोंदविण्यात आले असून वरील सर्व निवेदन हे आरोपीच्या सांगण्याप्रमाणे पुर्णतः व मी ऐकत असतांना खरे व बरोबर असे घेण्यात आले आहे.

20.12.25

**( अनंत रा. टेंगसे )**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
कोर्ट नं. २, अकोले

दिनांक – २०.१२.२०२५
ठिकाण – अकोले